बीड । बुधवार
११.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ७१
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१

# वटपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला वर्षाने मृत्यूला कवटाळले



## गेवराई तालुक्यातील एरंडगाव येथील दुर्दैवी घटना

## शरीरावर मारहाणीच्या खुणा ; गुन्हा दाखल करण्याची नातेवाईकांची मागणी !

### आरोपीच्या अटकेच्या मागणीसाठी संतप्त नातेवाईक जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात ; पोलीस प्रशासनाने आरोपींना अटक करण्याचे दिले आश्वासन

**बीड । प्रतिनिधी**

वटपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला एका विवाहित महिलेने आत्महत्या केल्याच्या घटनेमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त करण्यात येत असून विवाहित महिलेचा मृतदेह विहिरीत मिळाला असून मृतदेहावर मारहाणीच्या खुणा दिसत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून या प्रकरणात सासरच्या लोकांनीच महिलेला मारहाण करत जीवे मारले असल्याचा आरोप बाहेरच्या लोकांकडून करण्यात आला असून आरोपीवर खुनाचा गुन्हा दाखल करत तात्काळ अटक करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे.

पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाने अवघा महाराष्ट्र एकीकडे हादरून गेलेला असतना दुसरीकडे बीड जिल्ह्यातही विवाहितेंचा छळ होत असल्याच्या कारणाने त्या मृत्यूला कवटाळत असल्याच्या घडत आहेत. गेल्या आठवडाभरापूर्वी अंबेजोगाई तालुक्यात महिलाच्या छळ प्रकरणाने बीड जिल्हा हादरून गेला होता. पाठोपाठ काल गेवराई तालुक्यातील एंडगाव येथील २८ वर्षीय विवाहित महिलेच मृतदेह एका विहिरीत आढळून आला. तिच्या अंगावर मारहणीच्य खुणा असून माहेरच्या लोकांनी तिला मरून विहिरीत मारून टाकले असल्याचा आरोप केला आहे. नातेवाईकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात धाव घेत घेतली. दरम्यान पोलिस प्रशासनाने कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर दुपारी उशिरा शवविच्छेदन करण्यात आले. याबाबत अधिक माहिती अशी की गेवराई तालुक्यातील एरंडगाव येथील विवाहिता वर्षा ओमप्रकाश लाटे ही महिला काल सकाळी दहा वाजल्यापासून बेपत्ता होती. सकाळी ती शेतामध्ये अन्य एका महिलेसोबत काम करण्यासाठी आली मात्र त्या महिलेला मी घरी जात आहे. असे सांगून वर्षा शेतातून निघून गेली दुपारनंतर वर्षा शेतात आणि घरी नसल्याने तिचा शोध सुरू करण्यात आला मात्र ती मिळून येत नव्हती सायंकाळी चार ते पाच वाजल्याच्या दरम्यान लाटे यांच्या शेतातील विहिरीजवळ वर्षा हिचा स्कार्फ दिसून ▶▶ उर्वरित पान २ वर

# आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा : प.पूज्य प्रदीप मिश्राजी

### करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास व प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली भाविक भक्तांना आशिर्वाद दिले

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

देव हा देवच आहे, तो लहान किंवा मोठा नसतो, देवाची भक्ती ही भक्तीच असते ती कोणत्याही देवाची असली तरी चालते. नामस्मरणात मानवी जीवनाला सुख मिळत असते. त्यामुळे देवात भेद न करता देवा समान आई-वडिलांची सेवा करा असा मौलिक सल्ला परमपूज्य प्रदीप मिश्राजी यांनी दिला.



चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महा न संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपा आशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित शिवपुराण कथेत प्रदीप जी मिश्रा बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना मिश्राजी म्हणाले की, आपल्या आयुष्याच कल्याण करायचं असेल तर कोणीही देवा देवात भेद भाव करू नये. शिव श्रेष्ठ की विष्णु श्रेष्ठ हा भेद करू नये, माझा देव श्रेष्ठ दुसरा कनिष्ठ असा भेद करू नये. माझा मंत्र श्रेष्ठ त्याचा कनिष्ठ असा भेद करणे चुकीच आहे. तुम्हाला देव पाहायचा असेल तर खरा देव तुमच्या घरात आहे आई वडिलच ▶▶ उर्वरित पान २ वर

### २४ तास महाप्रसाद

**श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपा आशीर्वादाने व तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा कार्यक्रमास आलेल्या लाखो भाविक भक्तांना २४ तास महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व भाविक भक्तांना गेली अनेक वर्षे पासून महाप्रसादाची व्यवस्था माऊली दादाच्या कृपा आशीर्वादाने अविरत सुरू आहे.**

# मुरूगनाथम एम बीडचे नवे सिइओ!

**बीड । प्रतिनिधी**

अवघ्या आठ महिन्यापूर्वी जिल्हा परिषदेत रुजू झालेले सिइओ आदित्य जिवने यांची बदली झाली असून त्यांच्या जागी गोंदिया येथून मुरुंगनाथम एम हे येणार आहेत. राज्य शासनाने काही भाप्रसे अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. ज्यामध्ये बीड जिल्हा परिषदेचे सिइओ आदित्य जिवने यांचा समावेश आहे. जिवने यांना सहायक संचालक महावितरण येथे नियुक्ती देण्यात आली आहे. तर




गोंदिया जिल्हा परिषदेचे सिइओ मुरुंगनाथम यांच्यावर बीडची जबाबदारी देण्यात आली आहे.

# सामाजिक आलेखामध्येही बीड मागासलेलाच ?

## जिल्ह्यात ३०० हून अधिक बालविवाह, २५८ बालविवाह रोखले

**बीड । प्रतिनिधी**

आर्थिक विकासामध्ये पिछाडीवर असलेला बीड जिल्हा हा सामाजिक विकासामध्येही मागे असल्याचं वेळोवेळी दिसून येतंय. गेल्या वर्षी एकट्या बीड जिल्ह्यामध्ये ३०० हून अधिक बालविवाह झाल्याची नोंद आहे. तर २५८ बालविवाह थांबवण्यात प्रशासनाला यश आलं आहे. या प्रकरणी १८ जणांवर गुन्हा नोंदवण्यता आला आहे. जेवढ्या बालविवाहाची नोंद झाली आहे त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक बालविवाह झाल्याची चर्चा जिल्ह्यामध्ये आहे.

बीड जिल्ह्यात होणारे बालविवाह रोखण्यासाठी मागील काही वर्षांमध्ये प्रशासनाकडून जनजागृती केली जात आहे. त्याच माध्यमातून काही बालविवाह रोखण्यास प्रशासनाला यश



आलं. मात्र जिल्ह्यात बालविवाह रोखले जात असल्याने इतर ठिकाणी जाऊन बालविवाह होत असल्याची माहिती समोर येत आहे. ही चिंतेची बाब असल्याचं जिल्हा बाल प्रकल्प अधिकाऱ्यांनी सांगितलं. यात प्रामुख्याने ऊसतोड कामगार मुलांच्या बालविवाहाचा समावेश आहे.

बाहेरच्या जिल्ह्यात जाऊन बालविवाह - बीड जिल्हा समन्वयक बाल प्रकल्प अधिकारी अश्विनी जगताप यांनी सांगितलं की, गेल्या काही वर्षांमध्ये प्रशासनाने केलेल्या जागृतीमुळे आणि कडक अंमलबजावणीमुळे बालविवाहांची संख्या कमी झाली आहे. पण अजूनही अनेक लोक हे जिल्ह्याच्या बाहेर जाऊन बालविवाह लावतात ही चिंतेची बाब आहे. तसेच अनेक ठिकाणी बालविवाह होत असले तरी ते उघडकीस येत नाहीत. त्यामुळे बालविवाहांची संख्या ही नोंद केलेल्या संख्येपेक्षा जास्त ▶▶ उर्वरित पान २ वर

# महापालिका निवडणुकांबाबत मोठं पाऊल

## पुणे-ठाण्यासह ९ महापालिकांमध्ये प्रभाग रचनेचे आदेश, मुंबईमध्ये मात्र एकसदस्यीय प्रभाग रचना

**मुंबई । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठीच्या हालचालींना वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमिवर महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्य सरकानं ▶▶ उर्वरित पान २ वर




# मराठा आरक्षण वैधतेवर आजपासून सुनावणी

## याचिका लवकर निकाली काढण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या वैधतेवर बुधवारपासून हायकोर्टात नव्यानं सुनावणी होणार आहे. राज्य सरकारनं एसईबीसी कायद्याअंतर्गत दिलेल्या १० टक्के मराठा आरक्षणाविरोधातील याचिका दिर्घ काळापासून



हायकोर्टात प्रलंबित आहेत. या याचिका लवकर निकाली काढण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायायलयाने १५ मे रोजी जारी केले होते. उद्या सायंकाळी ५ वाजता या विशेष सुनावणीला सुरुवात होणार असल्याची माहिती हायकोर्ट ▶ उर्वरित पान २ वर

# मुंब्रा लोकल अपघाताच्या सहा थेअरी समोर, दुर्घटना नेमकी कशामुळे घडली?

**मुंबई । प्रतिनिधी**

सोमवारी, ९ जून रोजी सकाळी मुंबईच्या मध्य रेल्वे मार्गावर मुंब्रा स्टेशनजवळ एक भीषण दुर्घटना घडली. लोकलच्या दरवाजावर लटकणारे प्रवासी धावत्या ट्रेनमधून ट्रॅकवर पडले. यात काहींना आपला जीव गमावला. लोकलमधल्या गर्दीमुळे




आणि स्टेशनजवळच्या एका धोकादायक वळणामुळे ही दुर्घटना झाल्याचं बोललं जात आहे. पण या दुर्घटनेमागे इतरही काही तर्कही लढवले जात आहेत.

चार जणांचा जीव घेणारी आणि नऊ जणांना आयुष्यभराचा धक्का देणारी ही मुंब्रा लोकल दुर्घटना. ९ जूनच्या सकाळी झालेल्या या भीषण दुर्घटनेत ४ कुटुंबांनी त्यांच्या घरातल्या कर्त्या माणसांना गमावलं. तर ९ जणांनी मरणाला अगदी जवळून पाहिलं.

हे सगळं का घडलं? यात कुणाची चूक होती? यावर आजही चर्चा ▶▶ उर्वरित पान २ वर

# पेरण्यांची घाई नको; पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाऊस, पीक पाणी परिस्थितीचा आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**


राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषि विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदीचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या खते पुरवठा याबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 'राज्यातील सर्व भागात पंधरा जून मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पावसानंतर मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार ▶▶ उर्वरित पान २ वर



# मॉडेल सोलर व्हिलेज योजना




सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे. या योजनेविषयी ही माहिती- आपला भारत देश पर्यायाने महाराष्ट्र राज्य आणि राज्यातील गावे-घरे मोफत सोलर वीजेने ऊर्जावान करण्याचा संकल्प केंद्र व राज्य शासनाने केला आहे. अनेक नागरिक आपल्या निवासस्थानी सोलर यंत्रणा स्थापित करून वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याची अनेक उदाहरणं आपल्या सभोवताली दिसत आहेत. याच दिशेने आणखी एक पाऊल टाकत शासन 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने ९ ऑगस्ट २०२४ रोजी ज्ञापन प्रसिध्द केले आहे. त्यानुसार राज्यात ही योजना राबविण्याकरीता महाऊर्जा व महावितरणमार्फत प्रत्येक जिल्ह्यात एक गाव याप्रमाणे राज्यात २४ गावे महावितरण व १२ गावे महाऊर्जामार्फत 'मॉडेल सोलर व्हिलेज' म्हणून विकसित करण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांपैकी अमरावती जिल्ह्यातील एक गाव महाऊर्जामार्फत विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी अमरावती जिल्ह्यातील पाच हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत, अशी माहिती महाऊर्जाचे अमरावती विभागीय व्यवस्थापक प्रफुल तायडे यांनी दिली आहे.

पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत मॉडेल सोलर व्हिलेज या योजनेच्या संर्वांगीण व्यवस्थापनासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती (ऊडउ) नुकतीच गठीत करण्यात आली असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे या समितीचे सदस्य असून विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

मॉडेल सोलर व्हिलेज योजनेसाठी गाव निवडीबाबत पुढीलप्रमाणे निकष केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय मंत्रालयाव्दारे निश्चित करण्यात आले आहेत. १) जिल्ह्यातील निवड केलेले गाव हे महसूल गाव असावे व त्याची लोकसंख्या जनगणनेनुसार किमान ५ हजारापेक्षा जास्त असावी. २) स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या गावांमध्ये स्पर्धेच्या कालावधी दरम्यान जास्तीत जास्त विविध अपारंपारिक ऊर्जा साधने/सौर उपकरणे आस्थापित करणे गरजेचे आहे. सौर उपकरणांमध्ये पी.एम. सुर्यघर योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवर सोलर रुफ टॉप प्रकल्प उभारणी करणे तसेच पी.एम. कुसुम योजनेंतर्गत जास्तीत जास्त सौरपंप अथवा इतर विकेंद्रीत अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प स्थापित करणे गरजेचे आहे. व या अनुषंगाने या सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता १० मेगा वॅट पर्यंत असणे अपेक्षित आहे. ३) याकरीता सी.एस.आर.निधी, विभागाचा निधी किंवा जिल्हास्तरीय निधी व इतर उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करता येईल. ४) अग्रणी बँकेमार्फत वैयक्तिक लाभार्थ्याला सौर प्रकल्प उभारणीकरीता बँकेच्या पात्रता निकषानुसार कर्ज उपलब्ध होऊ शकेल. ५) स्पर्धेतील विजेत्या गावाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाऊर्जातर्फे तयार करण्यात येईल व प्राप्त होणाऱ्या एक कोटी एवढ्या केंद्रीय वित्तीय सहाय्यामधून गावाला पुढीलप्रमाणे गावातील कामे करता येतील.

गावासाठी सामुदायिक सौर प्रकल्प (बी.ई.एस.एस.) किंवा इतर प्रकल्प, एन आर एल एम बचत गटांसाठी विविध सौर प्रकल्प, गावातील शासकीय ईमारतींचे सौर विद्युतीकरण, सौर आधारित व इतर प्रकल्प, सौर कृषी पंप, इतर सौर अधारित तंत्रज्ञानावर असलेले अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प, बचत गट/प्राथमिक स्तरावरील सहकारी संस्था/डेअरी/मत्स्योद्योग प्रकल्प इत्यादी प्रकल्पासाठी ९० टक्के अर्थसहाय्य दिल्या जाणार आहे. या अनुषगांने निकषानुसार अमरावती जिल्ह्यातील पात्र असेलल्या गावांकडून १६ जून २०२५ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. अधिकाधिक गावांनी पुढाकार घेऊन आपले गाव आदर्श आणि ऊर्जावान करावे. याबाबत अधिक माहितीसाठी महाऊर्जा विभागीय कार्यालय,अमरावती यांचा दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.०७२१ २६६१६१०/८६६९९११०११ किंवा domedaamravatimahaurja.com या ईमेलवर संपर्क साधावा किंवा कार्यालयास प्रत्यक्ष भेट देण्यात यावी.

पान १ वरून पुढे...

## वटपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला...

आला त्यामुळे ती विहिरीत असावी म्हणून विहिरी शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा तिचा मृतदेह विहिरीत असल्याचे काहींच्या लक्षात आले तोपर्यंत तिचे माहेर असलेल्या ईटकुर येथल नातेवाईक घटनास्थळावर आले. जोपर्यंत पोलिस घटनास्थळी येत नाहीत तोपर्यंत मृतदेह काढला जाणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. शेवटी गेवराई पोलीस त्या ठिकाणी डेरे दाखल झाली पोलिसांच्या उपस्थितीत रात्री वर्षाचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास वर्षाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी गेवराईच्या ग्रामीण रुग्णालयाने पाठवण्यात आला . सकाळी जेव्हा नातेवाईकांनी तिचा मृतदेह पाहिला तेव्हा तिच्या अंगावर मारहाणीच्या खुणा आढळून आल्या. गळ्यावर, पायावर, यासह अन्य काही भागांवर मारहाणीच्या खुणा होत्या आमच्या मुलीचा खून करून तिच्या मृतदेह सासरच्या लोकांनी विहिरीत टाकला असा आरोप वर्षाच्या माहेरच्या लोकांनी केला. असून सासरच्या लोकां विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करत त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे. जोपर्यंत गुन्हेगारांना अटक केली जात नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेतला जाणार नाही अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली होती.

## आई वडिलांची...

तुमचा देव आहे आई वडिलांची सेवा हि जगातील सर्वात श्रेष्ठ देवाची सेवा आहे. आई वडील यांची सेवा करा शिव महादेव काहीही कमी पडू देणार नाही. देव आणि भक्ती हा संबंध जवळचा असून भक्ती केली तर देव मिळतो देव आहे त्यामुळे भक्ती केली पाहिजे श्रेष्ठ कनिष्ठ असा देवा त भेद करू नये भक्ती मध्ये मोठी शक्ती असून मानवी जीवनाच्या सुखासाठी नामस्मरण करणे गरजेचे आहे. देवाच्या भक्ती बरोबरच आई-वडिलांची सेवा केल्यास मानवी आयुष्यात सर्वांना सर्व काही मिळेल एवढी ताकद देवामध्ये आहे त्यामुळे देवाची भक्ती आणि आई-वडिलांची सेवा केलीच पाहिजे असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प. पूज्य. प्रदीप मिश्राजी यांनी केले. यावेळी राज्यभरातून आलेले लाखो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान मंगळवारी करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास व प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली भाविक भक्तांना आशिर्वाद दिले.

## सामाजिक आलेखामध्येही...

असण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील बालविवाह रोखण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी अशा पद्धतीचे बालविवाह होत असतील त्या ठिकाणचे सरपंच, तलाठी यांच्यामार्फत फॉलोअप घेतला जातो आणि अर्ध्या तासात तो बालविवाह रोखला जातो अशी माहिती अश्विनी जगताप यांनी दिली.

बालविवाहाची कारणे- मुलीच्या सुरक्षेच्या दृष्टीने ग्रामीण भागात पालक चिंतेत असतात. त्यात ऊसतोडीसाठी कामगारांचे स्थलांतर होते. त्यामुळे त्यांच्या किशोरवयीन मुलीचा प्रश्न निर्माण होतो. अशातच बालविवाहाचा पर्याय पालकांकडून निवडला जातो. त्यामुळेच बीड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात बालविवाहाचे सारखे प्रमाण आढळून आले आहे.

पान १ वरून पुढे...

## महापालिका निवडणुकांबाबत...

दिले आहेत. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश सरकारने दिले आहेत. यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे.

राज्यात गेल्या तीन ते चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य सरकारने आदेश दिले आहेत. राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणी आता प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष लावायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

मुंबईमध्ये एकसदस्यीय प्रभाग- महाराष्ट्रातील महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छ. संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत. मुंबईमध्ये आधी २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्याला आव्हान सर्वोच्च न्यायालयात देण्यात आलं होतं. पण ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये २२७ प्रभाग असणार आहेत.

अ वर्ग महानगरपालिका - पुणे, नागपूर

ब वर्ग महानगरपालिका - ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड

क वर्ग महानगरपालिका - नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली

ड वर्ग महापालिकांमध्ये तीन ते पाच सदस्य

ड वर्गातील महापालिकेत प्रभाग रचना ठरवताना शक्यतोवर सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत. मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा ५ सदस्यांचा होईल किंवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, संगाली-मिरज-कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकेचा समावेश आहे.

## मराठा आरक्षण...

रजिस्ट्रारतर्फे जाहीर करण्यात आली आहे. आरक्षणावर आधारीत मराठा विद्यार्थ्यांचं प्रवेश त्रिशंकू अवस्थेत- आरक्षणावर आधारीत मराठा विद्यार्थ्यांचं प्रवेश त्रिशंकू अवस्थेत आहेत. याची गंभीर दखल घेत वैद्यकीय प्रवेशात १० टक्के मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर तात्काळ निर्णय घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं १५ मे रोजी हायकोर्टाला दिले होते. फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरवत मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. हे आरक्षण देताना राज्यातील

पान १ वरून पुढे...

एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेल्यानं हे आरक्षण घटनाबाह्य असल्याचा आरोप करत मराठा आरक्षणाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात गेल्या वर्षी एप्रिलमध्ये विविध याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. याशिवाय मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थही काहींनी हायकोर्टाक याचिका दाखल केल्या आहेत. यावर आता एकत्रित सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे. या वर्षी जानेवारीमध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. त्याविरोधात याचिकाकर्ते सुप्रीम कोर्टात पोहचले. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना मराठा आरक्षण देणाऱ्या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर जलद सुनावणी करण्यासाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. या वर्षी जानेवारीमध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. न्यायमूर्ती उपाध्याय हे पूर्ण किंवा तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग होते जे गेल्या वर्षी एप्रिलपासून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (SEBC) कायदा, २०२४ विरुद्धच्या याचिकांवर सुनावणी करत होते. सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी न्या. रवींद्र घुगे, न्या. संदीप मारणे व न्या. निजामुद्दीन जमादार यांचे विशेष पूर्णपीठ स्थापन करण्यात आले आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याबाबत आदेश दिल्यानंतर उच्च न्यायालयाने मुख्य न्या. आलोक आराधे यांनी मराठा आरक्षणाशी संबंधित याचिकांवरील सुनावणीसाठी एक विशेष पूर्णपीठ स्थापन केले.

## मुंब्रा लोकल...

सुरुच आहे. यावरुन आरोप प्रत्यारोप होत आहेत आणि रेल्वे प्रशासनानं तर यावर उपाय म्हणून लोकलच्या 'बंद' दरवाजाचा मार्गही 'खुला' केला आहे. पण ही दुर्घटना घडण्यामागे सहा थिएरी समोर येत आहेत. त्या कोणत्या आहेत ते पाहुयात, १. लटकणारे प्रवासी एकमेकांना घासले- मुंब्रा स्टेशनजवळच्या एका धोकादायक वळण आहे. याच वळणावर कसाऱ्याकडून मुंबईकडे आणि ठाण्याहून कल्याणच्या दिशेनं जाणारी लोकल समोरासमोर आल्या. या दोन ट्रेनमधील अंतर इतकं कमी होतं की गर्दीमुळे दरवाजाला लटकणारे दोन्ही ट्रेनमधील प्रवासी एकमेकांना घासले आणि ट्रॅकवर पडले. २. लटकणाऱ्या प्रवाशांच्या बॅगा घासल्या- गर्दीच्या वेळी ऑफिसमध्ये, घरी किंवा इच्छित स्थळी वेळेवर पोहोचण्यासाठी प्रवासी लोकलला अक्षरश: लटकून प्रवास करतात. याच लटकलेल्या प्रवाशांच्या बॅगा मुंब्र्याच्या त्या धोकादायक वळणावर घडलेल्या दुर्घटनेला कारणीभूत ठरल्याचं बोललं जात आहे. त्या धोकादायक वळणावर दोन ट्रेन अगदी जवळ आल्या तेव्हा लटकलेल्या प्रवाशांचा बॅगा घासल्या गेल्या. त्यामुळे काही प्रवासी दरवाजातून थेट ट्रॅकवर पडले. ३. प्रवाशांमधल्या भांडणामुळे दुर्घटना- गर्दीच्या वेळी मुंबई लोकलमधल्या प्रवाशांमधली भांडणं नवी नाहीत. सोमवारी सकाळीही अशाच प्रकारची भांडणं झाली. त्यातूनच अपघाताची घटना घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. मात्र याला प्रत्यक्षदर्शी कोणताही पुरावा नाही. ४. सेल्फी स्टिकमुळे दुर्घटना- लोकलच्या दरवाजात प्रवास

पान १ वरून पुढे...

करणारा एखादा प्रवासी सेल्फी स्टिकनं शूट करत होता. मात्र मुंब्र्याच्या धोकादायक वळणावर त्याची सेल्फी स्टिक समोरच्या लोकलच्या प्रवाशांमध्ये अडकली. याच गदारोळात त्या प्रवाशासह इतर सहप्रवासी आणि समोरच्या लोकलमधले प्रवासीही खाली पडले अशी थिअरी मांडली जात आहे. ५. एका प्रवाशाला उलटी आली अन...लोकलमध्ये गर्दीच्या वेळी घुसमटून एका प्रवाशाला उलटी झाली असावी. त्यामुळे तो दरवाजाजवळ आला. याच सगळ्या गदारोळात सहप्रवाशांना धक्का लागून प्रवासी ट्रॅकवर कोसळले. ६. ट्रॅकवरील लोखंडी रॉडमुळे अपघात- एका लोकल डब्यावरचे ओरखडे पाहता लोखंडी रॉड किंवा अन्य वस्तू धडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या धक्क्यामुळेच प्रवासी धडाधड खाली कोसळले असावेत असाही अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. ही झाली अपघाताची एक ना अनेक कारणं. पण या सगळ्यात एक मुद्दा प्रकर्षानं अधोरेखित होतो तो म्हणजे रेल्वे प्रशासन, आणि सरकारचा कारभार. लोकलमधली प्रचंड गर्दी, लोकलच्या अपुऱ्या फेऱ्या, प्लॅटफॉर्मची लांबी आणि डब्यांची तोकडी संख्या. हे आणि असे अनेक प्रश्न मुंबईकर लोकल प्रवासी गेली अनेक प्रशासनासमोर मांडत आहे. त्याची दखल वेळेवर घेतली गेली असती तर?

## पेरण्यांची घाई...

जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. मोसमी पाऊस तीन-चार दिवसांत सक्रिय- मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात १२ जून रोजी मराठवाड्यातील काही भागात १२ ते १४ जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे १२ आणि १५ जून दरम्यान मुसळधार तर १३, १४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाऊ नये. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये, वीजा होताना झाडांच्या खाली आसरा घेऊ नये, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वीज पुरवठा खंडित करुन ठेवावा, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या स्त्रोतातून तत्काळ बाहेर पडावे, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.धरणातील पाणीसाठा समाधानकारक- राज्यातील सर्व प्रमुख धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याचे आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगण्यात आले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी माहिती दिली. धरणाचे नाव, सध्याचा पाणी साठा, गेल्या वर्षीचा साठा - गोसीखुर्द ४.६४ टीएमसी (८.६७), तोतलाडोह १८.७९ (१८.१४), ऊर्ध्व वर्धा ८.८५ (८.८७), जायकवाडी २२.६०(२.९९), मांजरा १.६३(०.००), ऊर्ध्व तापी हातनूर ५.३२(२.६३), गंगापूर २.५०(२.४८),

पान ४ वरून पुढे...

## स्थानिक गुन्हे...

चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सुशांत सुतळे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, विष्णु सानप, नितीन वडमारे व सचिन आंधळे, विकी सुरवसे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे. पॉवरग्रीड व कारखाण्यामधील सामान चोरणारी टोळी पकडल्याने चोरीवर आळा बसणार आहे.

## तेलगाव रोड...

दक्षिण बाजुला येणे जाणेसाठी डिवायडर मधुन रस्ता सोडने अति आवश्यक आहे, हॉटेल शांताई जालना रोड ते सह्याद्री हॉटेल राष्ट्रवादी भवन पर्यंत डिवायडर मधुन ९ नऊ रस्ते सोडलेले आहेत अगदी त्याच पद्धतीने राष्ट्रवादी भवन ते बार्शीनाका बीड बायपास पुलापर्यंत रस्ते सोडण्यात यावे अशी मागणीचे निवेदन मा.जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब आणि आ.संदीप क्षीरसागर साहेब यांच्याकडे देण्यात आले, सदर मागणीची दखल घेऊन आ. संदिप भैय्या क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सोबत घेऊन स्पॅट पाहाणी करून संबंधितांना सुचना दिल्या आहेत, यावेळी माजी आ.सलीम साहेब, मा.सभापती खुर्शीद आलम, अभियंता भोपडे साहेब, महेश शिंगण, मुफ्ती कौसर साहेब, वकील सर, शेख वाजेद, शेख अकील, मुश्ताक भाई, चक्रधर कदम, खदीर इनामदार, आकाश शिंगण, सैय्यद एजाज, शेख मोहसीन, अक्षय शिंगण, शेख कलीम, बंडू खेडकर, मोमीन अझहर, बालाजी शिंगण, फैय्याज मन्यार, ओम पाटील, शेख फारोक, योगेश भांडवले, मोमीन शहेबाज, अजय

पान ४ वरून पुढे...

घोडके वगैरे उपस्थित होते,

## घरकुलासाठीचे पाच....

यावेळी मोतीराम कांबळे, मोहन कांबळे, बाबासाहेब कांबळे, सुखदेव आडागळे, संजय कांबळे, बंडू आडागळे, अशोक कांबळे, भैया कांबळे, संकेत कांबळे, शाम कांबळे, किरण कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, विक्रांत कांबळे, पांडू कांबळे, कल्याण कांबळे, धुराजी आडागळे, प्रदीप कांबळे, शरद कांबळे, सुंदर कांबळे, शरद कांबळे, विकास कांबळे यांची उपस्थिती होती.

## लग्नाच्या आमिष...

तरुणाशी झाली होती. दोघांमध्ये मैत्री वाढली आणि त्याने लग्नाचे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने वेळोवेळी तिच्यावर शारीरिक संबंध ठेवले. सुरुवातीला लग्नाचे आश्वासन दिल्याने तरुणीने विरोध केला नाही. मात्र नंतर त्याने लग्न करण्यास नकार दिला. मे महिन्यात तरुणीला सतत पोटदुखीचा त्रास जाणवू लागला. त्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी तिला माजलगाव येथील खासगी रुग्णालयात तपासणीसाठी नेले. यावेळी डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत ती सुमारे पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार माजलगाव शहर पोलीस ठाण्यात सुनील अलझेंडे विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राष्ट्रवादी युवक...

असा विश्वास देखील व्यक्त होऊ लागला आहे.

पान ४ वरून पुढे...

युवकांच्या हक्काचे नेतृत्व जिल्हा अध्यक्षपदावर विराजमान- आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये आपल्या कर्तुत्वाने वेगळी ओळख निर्माण करणारे सतिश आबा शिंदे हे बीड जिल्ह्यातील प्रत्येक युवकाच्या मनामध्ये घर करून आहेत. आता हेच नेतृत्व राष्ट्रवादी पक्षाने ओळखले आणि त्यांच्यावर युवक बीड जिल्हा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. खऱ्या अर्थानं बीड जिल्ह्यातील युवकांच्या मनातील नेतृत्वाला न्याय मिळाला आणि आपल्या हक्काचे नेतृत्व मिळालं अशा भावना व्यक्त होत आहेत.

पक्षाचे व नेतृत्वाचे आभार - पै.सतीश शिंदे , नवनिर्वाचित युवक जिल्हाध्यक्ष बीड.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाने व पक्षाचे नेतृत्व देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष जयंतरावजी पाटील, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी विचारपूर्वक माझ्यावर टाकलेली युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी खंबीरपणे सांभाळेल आणि पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करेल असा विश्वास देतो आणि सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

## अवैध वाळू...

६०९०००/- (सहा लाख नऊ हजार) रुपयाचा माल दोन पंचासमक्ष जप्त करुन पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे दादासाहेब नारायण सानप पोना/१९२५, पो.स्टे बीड ग्रामीण यांचे फिर्यादीवरुन विनापरवाना बेकायदेशिर चोरटी वाहुतक करणारा चालक नामे गोकुळ किसन गायकवाड वय ३२ वर्षे रा. वासनवाडी ता.जि. बीड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करुन मिळुन आलेला चालक आरोपी यास दिनांक

पान ४ वरून पुढे...

१०/०६/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.

तसेच कुमशी रोडवरील रामगडाचे बाजुला विनापरवाना अवैध वाळुचा अंदाजे १५ ते १६ ब्रास साठा मिळुन आल्याने महसुल विभागातील तहसीलदार बीड यांचे ताब्यात पुढील कायदेशीर कारवाई कामी देण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक साहेब, बीड नवनीत कॉवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग बीड कमलेश मिना यांचे मार्गदर्शनाखाली पोनि मारुती खेडकर, काकरवाल, पोउपनि कुकलारे, पोह/१२८० प्रसाद कदम, पोह/बाळासाहेब दुबाले, पोना/१९२५ दादासाहेब सानप यांनी केली.

## जागतिक पर्यावरणदिनाच्या...

उप प्रादेशिक अधिकारी श्री.सोमनाथ कुरमुडे, तहसीलदार श्री.व्यंकटेश मुंडे, मुख्याधिकारी श्री.त्रिंबक कांबळे,भाजपा तालुकाध्यक्ष श्री.राजेश गित्ते, शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे, डॉ.शालिनीताई कराड, ॲड.शुभांगी गित्ते,लिंगायत समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.दत्ताअप्पा ईटके, श्री.सुभाषअप्पा भिंगोरे, माजी नगराध्यक्ष वैजनाथतात्या जगतकर,माजी नगरसेवक पवन मुंडे, चेतन सौंदळे, ॲड अरूण पाठक, श्रीकांत पाथरकर, वैजनाथ कळसकर,मनोहर कराड,मोहन जोशी, उमेश खाडे, सचिन गित्ते, मकरंद नरवणे, रमणीक पटेल, गणेश हरंगुळे, आश्विन मोगरकर, विकास हालगे, सुशील हरंगुळे, चंदूअण्णा हालगे, कैलास रिकीबे, सोमनाथ नाईकवाडे,लहू हालगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सामाजिक वनीकरण विभाग व नगर परीषद परळीच्या अधिकारी व कर्मचारी वृंदांनी परीश्रम घेतले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय ?

# सामाजिक न्यायमंत्र्यावर टाहो फोडण्याची वेळ

## लाडकी बहिण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा 820 कोटी 60 लाखांचा निधी वळवला : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

लाडकी बहिण योजनेसाठी राज्य सरकारने पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती घटकांसाठी असलेला ४१० कोटी ३० लाखांचा निधी वळवला असुन यावरून सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाटांनी जाहिररित्या अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केल्याने एकंदरीतच सामाजिक न्याय विभागाला कोणी न्याय देता का न्याय असे म्हणण्याची वेळ आल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले असुन या आधीही ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी वळविण्यात आला होता. आतापर्यंत सामाजिक न्याय व विशेष विभागाचा एकुण ८२० कोटी ६० लाख रुपये वळविण्यात आले आहेत.

आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी ३ वेळा वळविण्यात आला असून एकुण आदिवासी विभागाचा आतापर्यंत १ हजार ७ कोटी रुपये वळविण्यात आले आहेत. एकंदरीतच सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचे मिळुन लाडकी बहिण योजनेसाठी १८२७ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामाजिक न्याय विभागाला मागील ५ वर्षाच्या तुलनेत यावर्षीची ७,३१७ कोटी रुपयांचा निधी कमी मिळाला आहे. वर्षभरात तब्बल ६ हजार ७६५ कोटी रुपयांचा सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला जाणार आहे. हा अनुसूचित जाती व आदिवासी समाजातील लोकांवर अन्याय असुन याविरोधात आंदोलनाचा ईशारा डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे, शेख मुबीन,रामधन जमाले यांनी दिला आहे.

आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाच्या लोकसंख्येनुसार निधी वितरित करण्यात यावा असा नियम आहे. मात्र सामाजिक न्याय विभागात कमी निधी मिळाल्याचं पहायला मिळत आहे .महाराष्ट्रात एकूण ११.२३ कोटी लोकसंख्या आहे. त्यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या १.३३ कोटी आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ११.८४% अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाला एकूण तरतुदींच्या ११.८४% निधी मंजूर होणे अपेक्षित असताना ८ ते साडे ८ टक्के निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे २.४४ % तूट आहे.

सामाजिक न्याय विभागाला ७३१४ कोटी कमी निधी

यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २९ हजार ९७२ कोटी रुपये मंजूर झाला आहे. त्यातील जवळपास ५००० कोटी लाडकी बहीण आणि इतर योजनांसाठी तरतूद केली आहे. त्यामुळे २९ हजार ९७२ कोटी पैकी २२ हजार ६५८ कोटी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसाठी आहे. त्यामुळे एकूण बजेटच्या ७३१४ कोटी रुपयांची तूट पहायला मिळत आहे.

मागील ५ वर्षात प्रत्यक्षात आलेली तुट ( कोटीत)

सन २०२१-२२. ४,७०५ कोटी
सन २०२२-२३. ५,४७० कोटी
सन २०२३-२४. ६४७६ कोटी



सन २०२४-२५ ६७६४ कोटी
सन २०२५-२६. ७३१४ कोटी

मागील ५ वर्षातील आकडेवारी पाहता यावर्षी सर्वाधिक तुट सामाजिक न्याय विभागाची पहायला मिळत आहे. त्यामुळे वित्तमंत्री अजित पवार यांनी केलेला दावा आणि प्रत्यक्षात मिळालेला निधी यात मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. यावर्षी सामाजिक न्याय विभागाला २२ हजार ६५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. लाडकी बहिण आणि ईतर योजनांच अतिरिक्त मिळुन २९हजार ९३२ कोटींचा निधी आहे.तरीही सामाजिक न्याय विभागामध्ये ७३१४ कोटी म्हणजेच एकूण बजेटच्या २.४४ टक्के निधी कमी प्राप्त झालेला आहे.

## त्वरितापुरी महाविद्यालयात वृक्षारोपण व विद्यार्थी गुणगौरव सोहळा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न

**तलवाडा । प्रतिनिधी**

माजी जि.प. सदस्य तथा त्वरितापुरी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष - ॲड. सुरेश हात्ते हे नेहमी सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करतात व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात. हाच दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून सोमवारी त्वरितापुरी कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय तलवाडा याठिकाणी वृक्षारोपण तसेच दहावी-बारावी च्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये



मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच दहावी व बारावी च्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. फलके, डॉ, फलके, गटविकास अधिकारी श्रीमत कांवले मॅडम, देशमुख मॅडम, धनंजय शिंदे, पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल कोळी, माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अशोक तौर, माजी सरपंच राधाकिसन महाराज शिंगणे, बाबुराव शिंगणे, पत्रकार तुळशीराम वाघमारे, पत्रकार पत्रकार अल्ताफ कुरेशी, विष्णू राठोड,आर आर आबा बहिर,दत्ता मस्के, शेख खलील, सेवा सोसायटीचे सदस्य विकास नाना हात्ते, हभप दत्ता महाराज शिंगणे, महादेव हात्ते, कृष्णा कावळे टेलर, दादा काकडे, शेख मोवीन, सामाजिक कार्यकर्ते नजीर कुरेशी, वजीर कुरेशी, दत्ता कु-हाडे, शिक्षकवृंद, प्रा. डॉ. अशोक चोरमले प्रा. भारत चव्हाण, रवींद्र काकडे, प्रा. प्रकाश गाडे, प्रा. मदन पवार, विद्यार्थी व पालक तसेच विविध पक्ष-संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## शिवतीर्थावर श्री शिवराज शक ३५२ व शिवराज्याभिषेक दिन उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी (दि:- ९ जून २०२५) रोजी बीड येथील शिवतीर्थावर (छत्रपती शिवाजी महाराज स्मारक) शिवराज शक ३५२ प्रारंभ व शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला राज्याभिषेकासाठी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान बीड कडून ११ तीर्थक्षेत्र व गडकोटांवरील पाणी आणण्यात आले होते. आई तुळजाभवानी,राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब,धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना वंदन करून सात गडकोट-नद्यांच्या पाण्याने छत्रपती शिवाजी महाराजांना जलाभिषेक घालण्यात आला, तसेच छत्रपती श्री शिवशंभूच्या नेतृत्वाखाली शिवकार्य असेच घडत राहो व श्री शिवाजी श्री संभाजी रक्तगटाचा तरुण घडण्यासाठी असेच निस्वार्थी शिवकार्य करणाऱ्या तरुणांनी शिवतीर्थावर महाराजांकडून प्रेरणा घ्यावी असेही सांगण्यात आले. सदरील कार्यक्रमास श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान बीड व सर्व शिवभक्तांचे सहकार्य लाभले.



## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतले प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांचे दर्शन



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्य महोत्सवानिमित्त बीड तालुक्यातील चाकरवाडी येथे सुरु झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहात आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त कथा प्रवक्ते प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण कथेला उत्साहात सुरुवात झाली आहे. त्यांचे कथेच्या दुसऱ्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दर्शन घेतले.

कथेच्या सुरुवातीला ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत पूजा पार पडली. त्यांचे देखील आशीर्वाद घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कथा श्रवण केली. यावेळी डॉ. क्षीरसागर यांच्यासह भाजपचे नेते नंदकिशोर मुंदडा, डॉ.दिपाताई क्षीरसागर, संतोष सोहनी, शुभम धूत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांमध्ये भक्तिभावाचे वातावरण असून, परिसरात अध्यात्मिक ऊर्जा अनुभवता येत आहे.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयाकडून तुकाई माता डोंगर परिसरात बिजारोपण; जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अभिनव उपक्रम

**पाथर्डी । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाकडून हंडाळवाडी शिवारातील तुकाईमाता डोंगर परिसरात विविध प्रजातीच्या वनस्पतीचे बिजरोपण करण्यात आले. यामध्ये लिंब, करंज, सीताफळ, चिंच, बोर आदी वनस्पती बिजांचा समावेश होता. यावेळी सुमारे पाच हजारपेक्षा जास्त बीज रोपण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन



करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बबन चौरे यांनी वनस्पतींचे सामाजिक व पर्यावरणीय महत्व पाठवून दिले. ते म्हणाले, पर्यावरणाचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाची महत्त्वाची जबाबदारी आहे.सध्या प्रचंड वृक्षतोडी मुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे. दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत असून दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे.पर्यावरणातील अनेक औषधी वनस्पती नष्ट होत आहेत. तसेच वन्य जीवांचे ही प्रमाण कमी होत आहे. प्रदूषणासारख्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत त्यामुळे सामाजिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होत आहे .मानवी सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवायचे असेल तर पर्यावरणाचे संवर्धन व संगोपन करणे हे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने एक तरी झाड लावून त्याची काळजी घेण्याचा संकल्प आजच्या पर्यावरण दिनी करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. बिजरोपण कार्यक्रमास राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन एन एस एस विभाग प्रमुख डॉ.अरुण राख,प्रा.आनंद घोंगडे, एन सी सी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे, ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड यांनी केले.

## विलास बामणे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

### मंत्री पंकजा मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी दिल्या फोनवरून शुभेच्छा !

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते तथा चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते विलास बामणे यांचा वाढदिवस बीड शहरात विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी विलास बामणे यांना वाढदिवसाच्या फोनवरून शुभेच्छा दिल्या.

गेली अनेक वर्ष सामाजिक कार्यात सदा अग्रेसर असणारे चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ता विलास बामणे यांचा वाढदिवस शहरात विविध ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळेस बामणे यांनी विविध स्तरांमधून उत्स्फूर्तपणे वाढदिवस साजरा केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आहे.



## वामा लढाई सन्मानाची चित्रपटास पत्रकारांचा उत्तम प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

तेलुगु हिंदी, अवधी, भोजपुरी अशा इतर चार भाषांमधील नऊ हिट चित्रपटांनंतर आपल्या भूमिपुत्राच्या मराठी सिनेसृष्टीतील पहिलाच मराठी चित्रपट 'वामा लढाई सन्मानाची' संपूर्ण महाराष्ट्रात मागील ३ आठवड्यांपासून हाऊसफुल सुरू आहे.



बीडकरांनी देखील आपल्या भूमिपुत्राच्या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद दिला आहे. दिनांक ८जून २०२५ रोजी बीड मधील समस्त पत्रकार बांधवांसाठी वामा लढाई सन्मानाची स्पेशल शो चे आयोजन करण्यात आले होते. या चित्रपटास पत्रकारांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. जगात पदोपदी आढळणारा पुरुषी अहंकार व स्त्रिला त्यामुळे होणारा त्रास हा परंपरा म्हणून सर्वांनी स्विकारला आहे. आधुनिक म्हणवणाऱ्या काळातही तेच चालु आहे. पण स्त्रि-सशक्तीकरण झाल्यामुळे यात काय फरक पडु शकतो हे या चित्रपटात सरला या नायिकेची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री कश्मीरा कुलकर्णी यांनी या भूमिकेत स्वतःला अक्षरशा झोकून देत ती सादर केली आहे. पडद्यावर ही भूमिका साकारताना त्या जेवढ्या साध्या सरळ आणि सोज्वळ वाटल्या तेवढ्याच कणखर प्रसंगात अत्यंत आक्रमक आणि जोशाने भरपूर दिसल्या .त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव, संवादाची सादरीकरण ,शारीरिक भाषा अत्यंत उत्कृष्टरित्या त्यांनी सादर केली आहे. त्यांना पडद्यावर पाहताना चित्रपट रसिकांना वाटते की आपली आई बहीण पत्नी मुलगी अशीच कर्तबगार पाहिजे एवढी त्यांची भूमिका दर्शकाच्या मनावर परिणाम करते एवढेच काय मराठी चित्रपटातील अभिनेत्री सुद्धा हाणामारीच्या प्रसंगात कमी नाहीत हॉलीवुड च्या नायीके प्रमाणे त्यांनी पतीच्या भूमिकेत असलेल्या नायकला दाखविलीआहे.

कथानकाची लांबी फार नाही पण चित्रपट पुढे काय होते या उत्सुकतेपोटी प्रेक्षकाला खिळवून ठेवतो. चित्रपटाचे छायाचित्रण दर्जेदार व नयनसुख देणारे आहे.

कश्मिरा कुलकर्णीने भूमिका जोरदार वठविली आहे व स्त्रीचे वेगळेच रुप या चित्रपटात दिसते. जुई बेंडखळे यांनी त्यांच्या भूमिकेस न्याय दिला आहे. यात दोन शृंगारिक नृत्यही आहेत.(गौतमी पाटील आणि स्नेहा गुप्ता)

यातील नायकाची भूमिका डॉ.महेशकुमार यांनी वठविली आहे व रुढ नायकापेक्षा वेगळ्या धाटणीचा नायक त्यांनी अप्रतिम साकार केला आहे. असे अहंकारी पुरुष ( या चित्रपटातील नायक) आपल्याला जगात पदोपदी आढळतात व महेशकुमार यांनी तो सहजतेने (जी गोष्ट अवघड असते) साकारला आहे. शेवटी छोटे खानी कार्यक्रमात डॉ. महेश कुमार वनवे यांनी उपस्थित सर्व पत्रकारांचे मनापासून आभार मानले व महिला सशक्तीकरणावर आधारित वामा लढाई सन्मानाची चित्रपट असल्यामुळे चित्रपट गृहामध्ये सकाळच्या नऊच्या शोला येणाऱ्या पहिल्या १० महिलांसाठी हा चित्रपट दररोज विनामूल्य असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले.पत्रकार वैभव स्वामी. एस एम युसुफ,आत्माराम वाव्हळ, डॉ. संजय तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी भागवत वैद्य ,अभिजीत नखाते, शिवप्रसाद सिरसाट, रईस खान, राजू वंजारे , आदी सह पत्रकार व महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
बुधवार, दि.११ जून २०२५ पान ४


बीड जिल्हा सहकारी बोर्डाच्या उपाध्यक्ष पदी सुहास पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना मा आ.राजेंद्रजी जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अशोक हिंगे, नगरसेवक रमेश चव्हाण,शिक्षक नेते सुनील कुर्लेकर सर, सुहास उगले, हरिदास घोगरे सर, हमिद मामु, इमतियाज कुरेशी व ईतर मान्यवर.

## स्थानिक गुन्हे शाखेने पॉवरग्रीड व साखर कारखान्यांना तील साहीत्य चोरणारी टोळी पकडली

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये चोरीच्या घटना होत असल्याने चोरी करणाऱ्या टोळीला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर दाखल गुन्हयातील मौजे शेपवाडी येथील पॉवरग्रीड येथील १२,९५,०००/- किमतीचे अॅल्युमिनीयमचे साहीत्य चोरीस गेलेले होते व परळी वैजनाथ येथील साखर कारखाण्यामधील ६०,०००/- किमतोचे पितळी साहित्य चोरी गेले होते. या गुन्हयांचा तांत्रिक विश्लेषन व समांतर तपास करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, आरोपी नामे शेख जावेद शेख हबीब व त्याचे साथीदार तसेच बंडु लक्ष्मण जोगदंड व त्याचे साथीदार या दोन्ही टोळयांनी चोरले आहे. त्या टोळी मधील आरोपी परळी येथे आहेत त्यावरुन



लागलीच पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी पोलीस उपनिरीक्षक श्री सुशांत सुतळे यांचो टिम आरोपो शोध कामी परळी येथे रवाना केली. तेथे जावुन टिमने आरोपीचा शोध घेतला असता मोठ्या शिताफीने यातील आरोपी १. शेख जावेद हबीब, वय ३९ वर्ष, रा. बरकर नगर परळी वै. जि.बीड २. बंडु लक्ष्मण जोगदंड, वय ५० वर्ष, रा. रुमना जवळा ता. गंगाखेड, जि. परभणी ह.मु शिवाजीनगर परळी वै. ३. विजय नारायण जोगदंड, वय ४२ वर्ष, रा. भिमनगर परळी वै जि.बीड ४. शेख अब्दुल रौफ ईस्माईल, वय ४५ वर्ष, रा. जुना रेल्वे स्टेशन परळी वै जि. बीड ५. प्रेम रावसाहेब वाघमारे, वय १९ वर्ष, रा. नागसेननगर परळी वै जि.बीड ६. संतोष सोपान कांबळे, वय ३० वर्ष, रा मिलींदनगर परळी वै जि. बीड. यांना ताब्यात घेवुन पुढोल तपासकामी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्याचे कडुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर व परळी ग्रामीण असे चोरीचे दोन गुन्हे उघड करण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. यातील चोरीस गेलेले अॅल्युमिनीयम साहीत्य कोणास विकले, कोणाकडे आहे याचा संयुक्तरित्या शोध पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर व स्थानिक गुन्हे शाखा बीड हे घेत आहेत.

सदरील कारवाई ही नवनित काँवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती

▶▶ उर्वरित पान २ वर

## तेलगाव रोड ते राष्ट्रवादीभवन पर्यंत डिवायडर मधुन रस्ता सोडा: खुर्शीद आलम

### जिल्हाधिकारीना निवेदन दिले तर आ.भैय्यानी स्पॉट पाहाणी केली

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या मध्यभागातून जालना रोड ते तेलगाव रोड मार्गे पुढे जाणार्या नॅशनल हायवे रोडचे काम सुरू आहे. सदर रस्त्यावर डिवायडर टाकण्याचे काम सुरू आहे. सदर रस्त्यावरील डिवायडर मधुन आवश्यक ठिकाणी रस्ता सोडण्यात यावे अशी मागणी खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने बीडचे जिल्हाधिकारी साहेब तसेच बीडचे आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांच्याकडे केली आहे, निवेदनात म्हटले



आहे की बीड ते परळी तेलगाव रस्त्याचे काम सुरू असून सदर रस्त्याच्या सेंटरमध्ये डिवायडर टाकण्याचे काम सुरू आहेत. बीड शहरातील शरदपवार राष्ट्रवादी भवन ते तेलगाव नाका परळी रोड बीड बायपास पुला पर्यंत ५ ते ६ किलोमीटरचे अंतर असुन सदर मुख्य रोड भर वस्ती मधुन जातोय सदर रस्त्याच्या दोन्ही बाजुने मोठमोठ्या लोकसंख्यावाले मोहल्ले वस्त्या आहेत. सदर मुख्य रस्त्याचे दोन्ही बाजुला शाळा महाविद्यालय, दवाखाने, मंगल कार्यालय, मोठमोठे धार्मिक स्थळे आणि शापींग सेंटर आहेत त्यासाठी दक्षिण बाजुचे लोकांना उत्तर बाजूला येणे जाणेसाठी आणि उत्तर बाजूच्या लोकांना

▶▶ उर्वरित पान २ वर

## घरकुलासाठीचे पाच ब्रास वाळू पुरवठा टेंडर तालुका स्तरावर तात्काळ सुरु करा

### उपसरपंच अनिल राधे कांबळे यांची तहसील प्रशासनाकडे मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

घरकुलासाठी असलेल्या मोफत पाच ब्रास वाळू पुरवठा टेंडर तालुकास्तरावर सुरू करून त्यात होत असलेला अनागोंदी कारभार थांबवा अन्यथा उपोषण करण्याचा इशारा उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी तहसील प्रशासनाला निवेदनाद्वारे आज दि. १० जून २०२५ रोजी दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील घरकुल



लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध न झाल्यामुळे त्यांच्या बांधकाम कामास विलंब होत आहे. घरकुल योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यासाठी पाच ब्रास वाळूचा पुरवठा आवश्यक असून सद्यस्थितीत तालुका स्तरावर त्याबाबतचे टेंडर प्रक्रियेस प्रारंभ झालेला नाही. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक व मानसिक नुकसान होत आहे. तरी माजलगाव तालुक्यात तात्काळ वाळू (पाच ब्रास) टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात यावी अन्यथा दि.१२/०६/२०२५ पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा तहसील प्रशासनाला उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी दिला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर


बीड माजलगाव भाजपाचे प्रदेश सचिव किरण पाटील यांनी हॉटेल सनराईजला सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना समता परिषदेचे सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अॅड. सुभाष भाऊ राऊत व मित्रपरिवार दिसत आहे.

## लग्नाच्या आमिष दाखवून तरुणीवर बलात्कार; माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अनेकदा अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोट दुखू लागल्याने सदरील तरुणीची तपासणी केल्यानंतर पीडिता गर्भवती राहिल्याचे समोर आले.ही घटना मे महिन्यात उघडकीस आली असून याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिडीत तरुणीची सुनील अलजेंडे याच्याशी मैत्री झाली. त्यानंतर पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वेळोवेळी अत्याचार केले.तरुणीचे पोट दुखत असल्याने तिला आई-वडिलांनी रुग्णालयात नेले असता ती पाच महिन्याची गर्भवती असल्याचे उघड झाल्यानंतर सुनील अलझेंडे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा अधिकचा तपास माजलगाव शहर पोलीस करत आहेत. पीडित तरुणी ही सुमारे २० वर्षांची असून, तिची ओळख सुनील अलझेंडे या

▶▶ उर्वरित पान २ वर

## अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो पकडला



**बीड । प्रतिनिधी**

पोउपनि श्री. कुकलारे, पोह/१२८० प्रसाद कदम, पोना/१९२५ दादासाहेब सानप हे पोलीस ठाणे ग्रामीण हद्दीत पेटोलींग करत असताना रामगड ता.जि.बीड जवळ त्यांना गुप्तबातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वासनवाडी कडुन कुमशीकडे जाणारा रोडवर ०९.३० वा. सु. एक टेम्पो टाटा-७०९ ब्राउन रंगाचा पासींग क्रं. चक-१४ एच्-३४९२ त्याम ध्ये विनापरवाना बेकायदेशीर वाळु चोरीकरुन टेम्पोमध्ये भरुन वाळुची चोरटी विक्री करणे करता जात असताना मिळुन आल्याने त्यास थांबवुन टेम्पोवरील ड्रायव्हर नामे-गोकुळ किसन गायकवाड रा. वासनवाडी ता.जि. बीड असा चालक मिळुन आल्याने त्यास वाळु वाहतुकी बाबत कायदेशीर परवाना /रॉयल्टी बाबत विचारपुस केली असता सदर चालकडे कसलीही वाळु वाहतुकीची रॉयल्टी परवाना मिळुन आला नाही म्हणुन टेम्पो टाटा-७०९ ब्राउन रंगाचा पासींग क्रं. चक-१४ एच्-३४९२ व त्यामधील अंदाजे दीड ब्रास वाळु अशी एकुण किंमती

▶▶ उर्वरित पान २ वर

## राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्षाची जबाबदारी सतीश शिंदेंच्या खांद्यावर

### पै.सतिश शिंदेंच्या रूपाने राष्ट्रवादीला मिळाला खामक्या जिल्हाध्यक्ष

**आष्टी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीच्या बीड युवक जिल्हा अध्यक्षपदी पैलवान सतीश आबा शिंदे यांची निवड करून पक्षाला बळकटी देणारा नेतृत्व दिलं आहे. तरुणाईच्या गळ्यातील ताईन म्हणून ज्यांची ओळख असंच नेतृत्व बीड जिल्ह्याला मिळाल्याने पक्षाची मरगळ झटकली जाईल असा विश्वास व्यक्त होत आहे. पैलवान सतीश आबा शिंदे यांच्या निवडीने बीड जिल्ह्यातील तरुणाईत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये आपली वेगळी छवी निर्माण करणारे पैलवान सतीश आबा शिंदे यांच्या खांद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीकडून युवक बीड जिल्हा अध्यक्षपदाची जबाबदारी दिल्याने बीड जिल्ह्यातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाला जिल्हाध्यक्ष बरोबर युवक जिल्हाध्यक्ष देखील खाम



क्या मिळाला असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. सतिश शिंदे यांच्या रूपाने पक्षातील राहिलेली मरगळ सुद्धा झटकली जाईल आणि पक्षातील कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जा मिळू शकते. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सुद्धा सतिश आबा शिंदे यांचा मोठा फायदा होऊ शकतो

▶▶ उर्वरित पान २ वर



## जागतिक पर्यावरणदिनाच्या पूर्वसंध्येवर आनंदधाम येथे ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते वृक्षारोपण

**परळी वै. । प्रतिनिधी**

द्वादश ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत ग्रामीण पोलीस स्टेशन लगतच्या आनंदधाम लिंगायत सम ाजाच्या रूद्रभूमीत जागतिक पर्यावरणदिनाच्या पूर्व संध्येवर महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण,वातावरण बदल विभाग व पशु संवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते बिल्व(बेल) वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.

मोठया प्रमाणात होत असलेली वृक्षतोड तसेच प्रदूषणाम ुळे जागतिक तापमानात होत असलेली वाढ यामुळे दरवर्षी वाढत्या तीव्र उष्णतेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे तसेच प्लास्टिकच्या वापरामुळे अनेक दुष्परिणाम होतात त्याची निर्मिती आणि कचरा दोन्ही पर्यावरणासाठी हानिकारक आहे त्यामुळे प्लास्टिक प्रदूषणावर सर्वांनी मात करण्याची आवश्यकता आहे याकरिता प्लास्टिक मुक्त अभियानाचे आयोजनही करण्यात आले.

परळी व परीसरातील वाढते तापमान व प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी प्राणवायू निर्मिती करणा-या पिंपळ,वड ,बेल,कडूलिंब,चिंच,करंजी, शिसू सारख्या १२०० वृक्षांची लागवड करून त्याचे संवर्धनही परळी वृक्ष लागवड-संवर्धन समितीच्यावतीने आनंदधाम येथे करण्यात आले आहे.या उपक्रमाचे कौतूक व समाधान ना.पंकजाताई मुंडे यांनी केले असून सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांच्या विशेष प्रयत्नातून लिंगायत समाजाच्या रूद्रभूमीकरिता मिळालेल्या पाच एकर आनंदधामच्या जागेस सर्वो त्परी विकासासाठी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या कार्यक्रमात आनंदधाम येथील वृक्ष लाववड व परळी परीसरातील वृक्ष संवर्धनाचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल परळी तालुका सामाजिक विभाग अधिकारी श्री.हनुमंत जाधवर यांचा सत्कार ना.मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री.मनीष होळकर,

▶▶ उर्वरित पान २ वर

